


अपलिफ्ट इंडिया असोसिएशन - स्वाभिमान द्वारा

# मनोगत

|वस्तीवासियांचं मासिक माहितीपत्र|पुणे आवृत्ती|

ऐच्छिक मूल्य: रुपये २

अंक: ११
मे-२००७

मे १: कामगार दिन
मे १५: आंतरराष्ट्रीय परिवार दिन
मे ३१: तंबाखू विरोधी दिन

## संपादकीय...



संकटराव म्हणजे एकदम दोस्त माणूस. वस्तीतील पोरासोरांपासून ते कॉर्पोरेशनचे अधिकारी, नेतेमंडळी यांच्यापर्यंत सगळ्यांशी त्याची जानी दोस्ती. रोज नवीन बातमी संकटरावला कोठून लागते कोणास ठाऊक? सरकारची नवी स्कीम म्हणू नका, राजकीय पक्षाचा नवा कार्यक्रम म्हणू नका, वस्तीतली भांडणं, लफडी म्हणू नका सगळ्याची पहिली बातमी संकटरावाकडे असणार. पैसे कमावण्याच्या नव्या नव्या युक्ती त्याला अशाच बातम्यांमुळे सुचत.

आता मध्ये सरकारने हागणदारीमुक्त वस्तीची योजना जाहीर केली. संकटरावला पहिली बातमी लागली. जो कोणी उघड्यावर शौचास अथवा लघवीस बसेल त्याला १०० रुपये दंड आणि जो कोणी उघड्यावर शौचास बसलेल्यांना पकडून दाखवेल त्याला २०० रुपये बक्षिस! झाले. संकटरावने वस्तीतील चार-पाच दोस्तांना जमा करून एक योजना आखली. सगळ्यांनी सकाळी उघड्यावर शौचाला बसायचे आणि संकटरावने पोलिसांना बोलवायचे. म्हणजे पोलिस सगळ्यांना १०० रुपये दंड करतील आणि संकटरावला २०० रुपये बक्षिस देतील. डोकी १०० रुपये फायदा! झालेला फायदा सगळ्यांनी वाटून घ्यायचा. पोलिसांना समजलंच तर त्यांनाही थोडा वाटा द्यायचा! या अशा युक्तींमुळे संकटराव सगळ्यांत लोकप्रिय होता.

अशीच अजून एक स्कीम संकटरावला समजली. सरकार वस्तीतील सगळ्यांना नवीन घर देणार म्हणे. संकटरावने वस्तीत बातमी पसरवली आणि सगळ्याकडून नाव नोंदवायचे शंभर रुपये घेतले. तसेच काही दोस्तांना खाजगीत अजून एक युक्ती सांगितली. घर आपल्या नावावर झाले की ते भाड्याने द्यायचे व आपण जुन्याच घरात रहायचे! संकटरावच्या अशा युक्तींना जे भुलत असत ते कधी ना कधी नक्की संकटात सापडत.

एकदा तर पंधरा मिनिटात रेशन कार्ड देण्याची युक्ती घेऊन संकटराव आले. संकटरावने शंभर रुपयात अनेकांना रेशनकार्ड दिली. एक दिवस सरकारने खोट्या रेशनकार्डांची यादीच जाहीर केली. वस्तीतील सगळे जण संकटरावच्या अंगावर धावून गेले. संकटरावने सगळ्यांना शांत केले व दोन दिवसात तुमची नावे खोट्या यादीतून खऱ्या यादीत घालतो असे आश्वासन दिले आणि त्यासाठी सगळ्यांकडून अजून शंभर रुपये घेतले!

एकदा कॉर्पोरेशनमध्ये शिपायाच्या जागा भरायच्या आहेत असे संकटरावला समजले. वस्तीतल्या सगळ्या तरूण पोरांना कॉर्पोरेशनमध्ये लावून देतो म्हणून त्याने हजार हजार रुपये घेतले. तीन-चार महिने झाले तरी नोकरीचे नाव नाही. पोरं वैतागली. पण अशा पोरांना एका 'पार्टीत' शांत करण्याची कला पण संकटरावकडे आहे!

पण आता सरकारने अशा संकटरावांना पकडण्यासाठीच मोहीम उघडली आहे म्हणे. तेव्हा जरा जपून. अशा डोकेबाज संकटरावांपासून चार हात दूरच रहा कारण संकटरावचा मार्ग थेट पोलिस कोठडीत जातो. काय?

अशा संकटरावांशी दोस्ती करण्यापेक्षा चांगले मित्र, चांगल्या संस्था यांच्या सहवासात रहा. तुम्हाला अनेक बातम्या, सरकारी योजना, व्यवसायातील युक्ती सहज कळतील.. काय मग मनोगतशी दोस्ती करणार ना? हा मित्र दर महिन्याला तुमची वाट पहात आहे.

## यशाला शॉर्टकट नाही!




केरबा: नमस्कार हरबा. सावलीला बसलायंस? तब्येत बरी नाही की काय?
हरबा: सध्या बरी आहे पण बिघडेल आता.
केरबा: असं का म्हणतोस?
हरबा: मग काय म्हणू. उन्हाळा कडक लागलाय. आईसकांडीचा धंदा जोरात चालेल म्हणून सुरू केला तर झाला घोटाळा.
केरबा: चालला नाही का?
हरबा: तुझ्यासारखा गुरू असताना का नाही चालणार धंदा? जोरात चालला होता.
केरबा: मग काय झालं?
हरबा: मला रोज भरपूर बर्फ लागत होता. जरा महागाचा घ्यायचो मी. एकानं मला सांगितलं की दुसऱ्या आईस फॅक्टरीत निम्म्या रेटमध्ये मिळतो. म्हणून त्याच्याकडून घ्यायला सुरूवात केली. नफ्यात तर वाढ झाली; पण...
केरबा: (हसत) नफा वाढला म्हणून तुझी तब्येत बिघडली का?
हरबा: ऐक तर पुढं. मागच्या सोमवारी आईसकांडी विकत होतो. अर्धा माल खपला होता. तेवढ्यात वस्तीतली पोरं कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्याला घेऊन माझ्याकडे आली. अधिकारी मला म्हणाला की माझ्याकडील आईसकांडी खाल्ल्यामुळे दहा-बारा पोरांना उलट्या झाल्या. त्यांना हॉस्पिटलला ॲडमिट केलंय. त्यांनी माझ्या बर्फाचं सॅंपल पण बरोबर नेलंय. मी नंतर चौकशी केली तर कळलं की त्या आईस फॅक्टरी वाल्याला खराब पाण्याचा बर्फ बनवल्याबद्दल अटक झाली. आता सांग माझी तब्येत बिघडेल का सुधरेल?
केरबा: (धीर देत) अरेरे! अती हाव फारच वाईट. आलास की नाही गोत्यात. कोणताही धंदा करताना लोकांच्या जीवाशी खेळायचं नाही हे लक्षात ठेव. आपल्याच पोराला त्रास झाला असता तर?
हरबा: खरं आहे मित्रा.
केरबा: व्यवसाय वाढवायच्या सगळ्या युक्त्यांचा पाया म्हणजे प्रमाणिकपणा. तो जर नसेल तर सगळा डोलारा खाली कोसळेल. उन्हात ठेवलेल्या फुग्याची जशी हळूहळू हवा जाते तशीच प्रमाणिकपणा नसेल तर धंद्याची हवा पण हळूहळू निघून जाईल.
हरबा: आता याच्यापुढे पुन्हा असले उद्योग करणार नाही. कानाला खडा.
केरबा: आता कर्स बोललास. देरसे आया लेकीन दुरुस्त आया. चल आपणंच जाऊ कॉर्पोरेशनला काय झालं ते बघायला.
हरबा: धन्यवाद केरबा. संकट काळी मदत केल्याबद्दल. चल निघू या लगेच.

<u>मागील महिन्याचे उत्तर</u>

बँक अथवा संस्था नेहमीच कमी व्याज आकारते. तसेच एकदा कागदपत्रे तयार केली की ती कायमचीच उपयोगी पडतात. त्यामुळे सावकारापेक्षा बँक अथवा संस्थेतून कर्ज घ्यावे.

<u>या महिन्याचा प्रश्न</u>

केरबा हरबाला 'देरसे आया लेकीन दुरुस्त आया' असे का म्हणाला?



# दारू पिणाऱ्यांचे बहाणे...

- जीवनात रस उरला नाही!
- फार टेन्शन आलंय.
- प्रेमभंग...
- नोकरी नाही.
- एकटेपणा...
- खूप आनंद झाला!

दारू पिण्याच्या व्यसनाला दारू हेच एकमेव कारण आहे. बाकी सगळे 'बहाणे' आहेत.

UpLift
Enriching lives of the poor...together

# दारू पिणाऱ्यांस मिळणारी बक्षिसे!






# आजपासून दारू बंद.

असं नुसतं म्हणून दारू सुटत नसते. त्यासाठी हवी इच्छाशक्ती.

दारू हा 'आजार' आहे आणि तो बरा होऊ शकतो. आपण अथवा आपला नातलग, मित्रमैत्रिण कोणीही दारूच्या आहारी गेले असेल तर खालील मार्गांचा अवलंब करा;

- अेअे गट (व्यसन सोडू इच्छिणाऱ्यांचा गट)
- व्यसनमुक्ती केंद्र
- मानसोपचार तज्ज्ञाची मदत
- आमच्या कार्यकर्त्याला भेटणे व योग्य ती माहिती घेणे.

upliftindiaatul@gmail.com